## जंतर-मंतर

रंग केशरी निळ्या नभावर
बघता बघता चढला ना
तुला भेटता सखे जीवनी
छंद प्रीतिचा जडला ना

उजाड होते माळरान जे
बघता बघता फुलले ना
हसु अवखळ, मोहकसे ते
ओठांवरती, खुलले ना

मखमल आली वाटेवरती
आसमंत मोहरला ना
गाज सुखाची कानी येता
दु:खाचा काटा सरला ना

हात प्रिये तव हाती येता
अंतर सारे विरले ना
मनडोही नकळत प्रेमाचे
जंतर-मंतर फिरले ना

**©प्रीती देशपांडे**